दि. 14-07-2001

# जिल्हा प्रशासनाचे महत्व -

~~[1] आर्थिक~~

## [1] प्रशासकीय दृष्ट्या महत्व -

प्रत्येक कालात जिल्हाप्रशासनाचे अस्तित्व कायम होते. यावरून त्या त्या कालातील तत्कालिन प्रशासकीय गरजा लक्षात घेवून, जिल्हा प्रशासनाचे स्वरूप निश्चित करण्यात आलेले होते. प्रशासकीय गरजे बरोबरच सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि भौगोलीक गरजांच्या पूर्ततेसाठी जिल्हा प्रशासनाची निर्मिती करणे क्रमप्राप्त ठरते. यामध्ये प्रशासकीय दृष्ट्या आणि प्रशासनाच्या सोयीसाठी जिल्हा प्रशासन महत्वाचे मानले गेले. मोगल कालात सुद्धा संपूर्ण राज्याचे प्रशासन एकाच ठिकाणाहून चालविले. तत्कालीन राजाला शक्य नव्हते. प्रशासकीय विकेंद्रीकरण करणे राज्य कारभाराच्या दृष्टीने त्यांना हितकारक वाटले. म्हणूनच ती सत्ता जिल्हा प्रशासनाच्या पातळीवर सुध्दा विकेंद्रीत करण्यात आली.

यातील दुसरे कारण असे की सत्ता विकेंद्रीकरणाच्या माध्यमातून अनेक लोकांना पदे देण्यात आली. प्रशासकीय पद प्राप्त झाल्यामुळे तत्कालीन प्रशासकीय अधिकारी कार्यक्षमरित्या कार्य करीत असत. स्वाभाविकच प्रशासनात त्यामुळे गती आली अशा प्रकारे प्रशासकीय दृष्ट्या जिल्हा प्रशासनाचे अनन्य साधारण महत्व आहे

## [2] भौगोलिक दृष्ट्या -

मोगल कालात राज्याचा विस्तार खूपच व्यापक असल्या कारणाने दुसऱ्या विस्तार्नि भूभागावर

नियंत्रण ठेवणे मोगल सम्राटांना शक्य नव्हते. त्यामुळेच या विस्तीर्ण भूभागावर भौगोलीक दृष्ट्या विभाजन करून त्या त्या पातळीवर त्यांनी प्रशासकीय अधिकार दिले. यातीलच जिल्हा प्रशासन हा एक महत्वाचा भौगोलीक घटक होय.

③ सामाजिक दृष्ट्या -

प्रशासकीय आणि भौगोलिक दृष्ट्या जसे जिल्हा प्रशासनाचे महत्व आहे. तसेच सामाजिक दृष्ट्या सुद्धा जिल्हा प्रशासनाला महत्व प्राप्त झालेले आहे. सामान्यतः असे दिसून येते की, एका विशिष्ट भूभागावर सारख्याच स्वरूपाची समाज रचना असते, त्या समाजाच्या गरजा आणि त्यांचे प्रश्न हे सुद्धा सारख्याच स्वरूपाच्या असतात. यामुळे जर त्या विशिष्ट भूभागाची जिल्हा प्रशासनासारखी यंत्रणा निर्माण करण्यात आली तर तेथील समाजाचे प्रश्न लवकर सुटतात.

④ आर्थिक दृष्ट्या -

आर्थिक दृष्ट्या विचार करता जिल्हा प्रशासन हे उपयुक्त ठरते कारण त्या त्या भौगोलिक परिसराच्या आर्थिक गरजा, आर्थिक साधने ही जवळ जवळ सारखीच असतात यामुळे स्वाभाविकतः जिल्हा प्रशासनाला त्या विशिष्ट भूभागासाठी विशिष्ट स्वरूपाची यंत्रणा राबविणे सोयीचे जाते. यामुळेच आर्थिक दृष्ट्या ही जिल्हा प्रशासनाची निर्मिती हितावह असते.

सारांश रूपाने असे म्हणता येईल की जिल्हा प्रशासन हे भौगोलीक, प्रशासकीय, सामाजिक

दि. 14-07-2001

आणि आर्थिक दृष्टीकोनातून उपयुक्त ठरते. विशेषतः लोकशाही प्रधान देशात प्रशासकीय सत्तेचे विकेंद्रीकरण असल्याने अशा लोकशाही शासन प्रणालीमध्ये जिल्हा प्रशासनाचे अनन्य साधारण असे महत्व आहे.

~~5 राजकीय दृष्ट्या~~ –

### 6 प्रशासनाचा आधार –

जिल्हा प्रशासनाला प्रशासनाचा आधार मानला जातो. जिल्हा प्रशासन या घटकावरूनच राज्याची एकूण प्रशासकीय इमारत उभी राहिलेली असते. जिल्हा प्रशासनाच्या सहकार्या शिवाय राज्याचे प्रशासन काम करू शकत नाही. कारण अधिनस्त पातळीवर जिल्हा प्रशासनच राज्याला सहकार्य करीत असते. म्हणून एकूण प्रशासनाचा जिल्हा प्रशासन आधार मानला जातो

### 7 राज्याची उद्दिष्टे अमलात आणण्यासाठी –

जिल्हा प्रशासन राज्याच्या ध्येयधोरणांची अमलबजावणी करत असते. राज्याने ठरविलेल्या किंवा निश्चित

Scanned with OKEN Scanner

दि. 16-07-2001

केलेल्या उद्दिष्टाची पूर्तता करण्याचे कार्य प्रशासनाला करावे. राज्याने ज्या विविध कल्याणकारी योजना निश्चित केलेल्या असतात अशा कल्याणकारी योजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी जिल्हा प्रशासन करत असते. जी काही विकास कामे राज्याने ठरविलेली आहेत. अशा विकास कामाला प्रत्यक्षात जिल्हा प्रशासन राबविते थोडक्यात असे की, राज्याची उद्दिष्ट प्रत्यक्षात आणण्यासाठी जिल्हा प्रशासनाचे महत्व आहे.

8) महसूल गोळा करण्यासाठी -

मुळातच जिल्हा प्रशासनाची निर्मिती महसूल गोळा करण्यासाठी झालेली होती. महसूल गोळा करणे हे जिल्हा प्रशासनाचे परंपरागत कार्य आहे. हे कार्य जिल्हा प्रशासन आजही करत आहे. महसूल गोळा करणे, कर गोळा करणे अनुदान प्राप्त करणे ही आणि अशा स्वरूपाची कार्ये जिल्हा प्रशासन करत असल्याने या प्रशासनाचे आज अनन्य साधारण असे महत्व आहे.

9) शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी

शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करणे हे सुध्दा जिल्हा प्रशासनाचे परंपरागत कार्य आहे. परंतु अलिकडे या कार्याची व्याप्ती वाढलेली आहे. कारण शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्याचे प्रश्न अलिकडे गंभीर स्वरूपात निर्माण होत आहे. त्याची कारणे पाहता असे दिसून येते की, जातीय दंगली, मोर्चे, जाळपोळ, बंद, आणि अशा स्वरूपाच्या कारणामुळे जिल्ह्यातील शांतता आणि सुव्यवस्थेला धोका निर्माण झालेला आहे. अशा वेळी ही परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी

Scanned with OKEN Scanner

दि. 16-07-2001

जिल्हा प्रशासनाला सतर्क राहावे लागते. कारण जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करणे हे जिल्हाधिकाऱ्यांचे म्हणजे जिल्हा प्रशासनाचे कार्य आहे.

**10 शासनाच्या विविध योजनांची माहिती देणे –**

केंद्र सरकार किंवा राज्य सरकार यांच्या ज्या विविध योजना असतात त्या विविध योजना जनसामान्या पर्यंत पोहचविण्याचे कार्य जिल्हा प्रशासन करत असते. अशा कल्याणकारी स्वरूपाच्या योजनांचा लाभ जिल्ह्यातील जनसामान्यांना झाला पाहिजे अशी जिल्हा प्रशासनाची भूमीका असते यामुळे जिल्हा प्रशासनाचे महत्व निश्चितच वाढले आहे.

**11 नैसर्गिक आपत्तीत सहकार्य -**

नैसर्गिक आपत्तीमध्ये नागरीकांना सहकार्य करण्याचे महत्वपूर्ण जबाबदारी जिल्हा प्रशासनावर असते. अतिवृष्टी, अनावृष्टी, महापूर, भूकंप, आग या आणि अशी परिस्थिमध्ये जर जिल्हा संकटात सापडला असेल तर यासाठी तातडीने उपाय योजना करून नागरीकांना मदत करणे हे कार्य जिल्हा प्रशासनाचे आहे.

वरील सर्व मुद्द्यांवरुन असा ~~निष्कर्ष~~ निष्कर्ष निघतो की दिवसें दिवस प्रशासकीय व्यवस्थेत जिल्हा प्रशासनाचे महत्व फारच (खूपच) वाढले आहे. यामूळेच जिल्हा प्रशासनाला प्रशासनाचे डोळे किंवा कान मानले जाते. अशा प्रकारे आधुनिक काळातील प्रशासनात जिल्हा प्रशासनाचे महत्व दिसून येते.

Scanned with OKEN Scanner

दि. 17-07-2001

## जिल्हा प्रशासनाचे घटक

जिल्हा प्रशासनाचे महत्व पाहिल्यानंतर असे लक्षात येते की जिल्हा प्रशासनाला आपल्या जिल्ह्यात व्यापक स्वरुपात कार्ये पार पाडावी लागतात. या मध्ये प्रामुख्याने शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करणे, कृषी विषयक कार्ये, आरोग्य विषयक कार्ये, महसूल गोळा करणे बाबतचे कार्ये, शिक्षण विषयक कार्ये, समाज कल्याण इत्यादी स्वरुपांचे कार्ये पार पाडावे लागते. हे कार्ये पार पाडीत असताना केवळ जिल्हाधिकारी यांना ही सर्व जबाबदारी पार पाडणे अशक्य असते त्यामुळेच वेगवेगळ्या कार्यासाठी जिल्हा परिषदेत वेगवेगळे विभाग निर्माण करण्यात आलेले असतात. तसेच या वेगवेगळ्या विभागावर वेगवेगळे अधिकारी सुध्दा कार्यरत असतात. या अधिकाऱ्यांच्या साह्याने जिल्हाधिकारी जिल्ह्यातील सर्व प्रकारची कार्ये करुन घेतात. यामुळेच प्रामुख्याने जिल्हा प्रशासनाचे तिन घटक मानले जातात. हे तिन घटक खालील प्रमाणे असतात.

1. कायदा व सुव्यवस्था
2. कारागृह किंवा तुरुंग प्रशासन
3. महसूल

हे तिन जिल्हा प्रशासनाचे प्रमुख घटक मानले जातात. या तिन्ही घटकांचे स्वरुप या प्रमाणे आहे.

1) **कायदा व सुव्यवस्था** - जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी हा घटक महत्वाची कार्ये

दि. 17-07-2001

करतो. जिल्ह्यात शांतता प्रस्थापित करण्याचे कार्य ज्यांच्या मार्फत केले जाते. ते अधिकारी खालील प्रमाणे आहेत.

(1) जिल्हा न्यायाधिश (2) जिल्हा पोलीस आयुक्त
(3) जिल्हा उपपोलीस अधिक्षक (4) सर्कल इन्स्पेक्टर
(5) पोलीस निरिक्षक (6) उपपोलीस निरिक्षक
(7) पोलीस पाटील (8) नागरी समित्या यासिवाय
ऽ सि. आय. डी., एस., आइ.बी., आर.ए.एफ. आणि वेळ पडली तर सैन्याचाही पाचारण केले जावू शकतो अशा या वेगवेगळ्या अधिकाऱ्याकडून जिल्हाधिकारी आपल्या जिल्ह्याच्या कार्यक्षेत्राले शांतता व सुव्यवस्था प्रस्थापीत करतात.

(2) कारागृह किंवा तुरुंग प्रशासन -

सामाजिक शांतता धोक्यात येवू, समाज स्थैर्याला तडा जावू नये या साठी जिल्हा प्रशासनाला दक्षता घ्यावी लागते. ज्या समाज विघातक शक्ती आहे, गुंडगीरी प्रवृतीची जि मानसे आहेत. अशी मानसे जर समाजात वावरत असतील तर सामाजिक स्थैर्याला व शांततेला धोका निर्माण होतो यासाठीच अशा व्यक्तीचा बंदोबस्त करणे. त्याना समाजापासून दूर ठेवणे याची काळजी जिल्हा प्रशासन घेत असते. आणि यासाठीच कारागृह किंवा तुरुंग याची व्यवस्था जिल्ह्यात करण्यात आलेली असते.

(3) महसूल -

या पूर्वीच विवेचन केल्याप्रमाणे महसूल गोळा करण्याच्या उद्देशानेच जिल्हाप्रशासनाची निर्मिती झालेली आहे. याच कामासाठी जिल्हाप्रशासन

Scanned with OKEN Scanner

दि. 17-07-2001

निर्माण झाले. समाजाच्या कल्याणासाठी, समाजाच्या विकासासाठी पैसा उभा करणे गरजेचे असते कारण वेगवेगळ्या विकास योजना जिल्ह्यात राबविल्या जातात. विविध असे विकास कार्यक्रम तयार केले जातात. या विकास योजनांना किंवा विकास कार्यक्रमाला प्रत्यक्षात आणण्यासाठी कर रुपाने पैसा उभा केला जातो. हाच कर किंवा महसूल गोळा करण्याचे कार्य जिल्हा प्रशासन करत असते. म्हणूनच महसूल गोळा करणारा विभाग हा जिल्हाप्रशासनाचा एक अविभाज्य घटक मानला जातो.

या तिन घटकांच्या सहकार्याने जिल्हा प्रशासन आपली भूमिका प्रभावी रित्या पार पाडत असते.

**प्र.** जिल्हा प्रशासनाचे महत्व विशद करुन जिल्हा प्रशासनाच्या घटकाची माहिती द्या.

दि. 18-07-2001

## कायदा व सुव्यवस्था

कायदा व सुव्यवस्था हा प्रशासनाचा महत्वाचा प्रश्न असतो. तसाच तो जिल्हा प्रशासनासाठी महत्वाचा प्रश्न आहे. कायदा आणि सुव्यवस्था ही जिल्हा प्रशासना समोरील एक समस्याही समजली जाते. कारण जो पर्यंत शांतता आणि सुव्यवस्था जिल्ह्यात असणार नाही तो पर्यंत जिल्हा प्रशासन सुयोग्य पध्दतीने काम करु शकणार नाही. आणि जर जिल्ह्यात शांतताच राहत नसेल तर त्या जिल्ह्यात विकास कामे सुध्दा करता येणार नाहीत. त्यामुळे शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करणारा विभाग हा हि जिल्हा प्रशासनाच्या महत्वाचा एक घटक मानला जातो. एक विशिष्ट स्वरुपाची परिस्थिती म्हणजे कायदा व सुव्यवस्था होय. असे ढोबळ मानाने मानले जाते. तसा कायदा व सुव्यवस्था हा विषय राज्याच्या कक्षेत येणारा विषय आहे. परंतू राज्य जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून हे कार्य करत असते

कायदा म्हणजे रुढ झालेले असे नियम कीज्याना समाजाने मान्यता दिलेली आहे आणि ते नियम पाळणे समाजाला बंधनकारक असते.

कायद्याची दुसरी अशीही व्याख्या दिली जाते की, “विवेक बुध्दीचे प्रतीक म्हणजे कायदा.” याचा अर्थ कायदा हा विवेकावर आधारलेला असतो आणि म्हणूनच समाजातील प्रत्यक घटकानी कायद्याचे पालन करणे आवश्यक असते. प्रत्येकाने कायदा पालन केले तर समाजात शांतता निर्माण होते या वर जर नागरीका

Scanned with OKEN Scanner